**शासकीय/निमशासकीय सेवेतून शिक्षण सेवक पदावर नियुक्त होणाऱ्या उमेदवारांची वेतननिश्चिती करणेबाबत स्पष्टीकरण..**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण २०२५/प्र.क्र. ८७२/टीएनटी-१**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
**दिनांक : १५ जून, २०२६.**

**संदर्भ :** शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, समक्रमांक, दि. १८.०२.२०२६

**शासन परिपत्रक :**

नियमित शासकीय सेवेतील अथवा ज्याचे वेतन अनुदान शासनामार्फत अथवा स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत अदा केले जाते, अशा नियमित निमशासकीय सेवेतील व्यक्ती ज्यावेळी राज्यातील शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा तसेच या विभागाच्या अधिपत्याखालील १०० टक्के अनुदानित खाजगी शाळा ज्यामध्ये प्राथमिक/उच्च प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळा तसेच अध्यापक विद्यालये/शासकीय विद्यानिकेतने व सैनिकी शाळा या शाळांमधील कोणत्याही स्तरातील व कोणत्याही माध्यमातील शिक्षण सेवक पदावर विहित पध्दतीने नियुक्ती होतो, त्यावेळी त्यास वेतन संरक्षण देण्यासाठी त्यांची वेतन निश्चिती कशाप्रकारे करण्यात यावी, याबाबत संदर्भाधीन शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

२. वेतन संरक्षण व वेतननिश्चितीबाबत उपरोक्त प्रमाणे तरतूदी करण्यात आल्या असल्या तरी या शासन निर्णयाची अंमलबजावणी क्षेत्रिय स्तरावर होत नसल्याबाबतच्या अनेक तक्रारी शिक्षक संघटना, लोकप्रतिनिधी व पात्र उमेदवारांकडून प्राप्त होत आहेत. वस्तुत: संदर्भाधीन शासन निर्णयातील तरतुदी स्वयंस्पष्ट आहेत. असे असतानाही क्षेत्रिय कार्यालयांकडून सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबतची अनास्था अनाकलनीय आहे. प्राप्त झालेल्या निवेदनांद्वारे काही मुद्दांबाबत अधिकचे स्पष्टीकरण अपेक्षिले आहे. हे मुद्दे व त्याबाबतचे शासनाचे स्पष्टीकरण याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | उपस्थित मुद्दे | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १. | पूर्व सेवेतील शिक्षक व्यतिरिक्त इतर विभागातील सेवा जसे की, वर्ग-४ अथवा गट-ड मधून (शिपाई/परिचर/ पहारेकरी/कक्षसेवक व इतर गट-ड पदावरुन) तसेच वर्ग-३ अथवा गट-क मधून (लिपिक/तलाठी/ग्रामसेवक/ पोलीस अंमलदार व इतर गट-क पदावरुन) शासकीय/ निमशासकीय सेवेतील उमेदवारांची पवित्र पोर्टलद्वारे नियुक्ती होऊन असमान असलेल्या शिक्षण सेवक पदावर विहित पध्दतीने रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना सेवा जोड सह वेतननिश्चितीचे लाभ देण्यासाठी सदर शासन निर्णय लागू होतो किंवा कसे, | उमेदवाराची पूर्वीची नियुक्ती गट-क मधील आहे अथवा गट-ड मधील आहे या बाबी विचारात न घेता उमेदवार नियमित नियुक्तीने कार्यरत होता किंवा किंवा कसे, पूर्वीच्या पदावर स्थायीत्व लाभ प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी ज्या अटी व शर्ती आवश्यक आहेत त्याची पूर्तता उमेदवार करीत आहे किंवा कसे, शिक्षण सेवक पदासाठी केलेला अर्ज पूर्वीच्या कार्यालयाच्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीने केला आहे किंवा कसे तसेच पूर्वीची नियुक्ती व नवीन नियुक्ती यामध्ये बदलीच्या नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या पदग्रहण अवधीहून अधिक खंड असू नये इतक्याच बाबी विचारात घ्यावयाच्या आहेत. |
| २. | लागू होत असल्यास, कमी किंवा जास्त वेतनश्रेणीवरून आलेल्या म्हणजेच नियुक्ती समान पदावर झाली नसल्यास सदर कर्मचाऱ्यांची सेवाजोड व वेतननिश्चिती कोणत्या टप्प्यावर करावी? | संदर्भाधीन शासन निर्णयातील परि. २ अन्वये वेतन संरक्षण देण्यासाठी वेतन निश्चिती कशाप्रकारे करण्यात यावी, याबाबत स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे. सदर तरतूद खालील उदाहरणासह स्पष्ट करण्यात येत आहे.<br>उदा : क्ष ही व्यक्ती एस-७ या वेतनश्रेणीत रु.२५,२००/- इतके वेतन घेत असताना त्याची एस-१० किंवा एस-१४ या वेतनश्रेणीतील शिक्षण सेवक पदावर निवड झाल्यास त्याची वेतननिश्चिती एस-१० या वेतनश्रेणीतील किमान टप्प्यावर म्हणजे रु. २९,२००/- या टप्प्यावर तर एस-१४ या वेतनश्रेणीतील रु. ३८,६००/- या किमान टप्प्यावर होणे आवश्यक आहे. जर सदर व्यक्ती एस-७ या वेतनश्रेणीत रु. ३०,२००/- इतके वेतन घेत असताना त्याची वरीलप्रमाणे निवड झाल्यास एस-१० या वेतनश्रेणीतील रु. ३१,०००/- या पुढील |
| ३. | उदा. पूर्वीच्या शासकीय/ निमशासकीय सेवेतील पदावर एखादा कर्मचारी S-७ किंवा त्याखालील वेतन श्रेणीतील वेतन घेत असतील तर त्यांची वेतननिश्चिती धारण करत असलेल्या शिक्षक पदावरील देय वेतनश्रेणीतील किमान वेतनाचा टप्पा S-१० किंवा S-१४ किंवा त्यावरील जो टप्पा लागू असेल त्या टप्प्यावर करावी का? याबाबत स्पष्टता असावी. | |

<table>
<tr><td></td><td></td><td>टप्प्यावर वेतननिश्चिती होणे आवश्यक आहे. तर एस-१४ या वेतनश्रेणीसाठी त्याची किमान टप्प्यावर वेतननिश्चिती होणे आवश्यक आहे.</td></tr>
<tr><td>४.</td><td>सेवाजोड व वेतननिश्चिती करून द्यावयाचा वेतनश्रेणीचा प्रत्यक्ष लाभ शासन निर्णयाच्या दिनांकापासून म्हणजे १८ फेब्रुवारी, २०२६ पासून द्यायचा कि सदर कर्मचाऱ्यांचा शिक्षण सेवक कालावधी संपल्यानंतर द्यायचा आहे?</td><td rowspan="3">संदर्भाधीन शासन निर्णय निर्गमित होण्याच्या दिनांकास ज्या उमेदवाराचा शिक्षण सेवक कालावधी चालू होता, अशा उमेदवारांची वेतननिश्चिती संदर्भाधीन शासन निर्णयाच्या दिनांकापासून म्हणजेच दि. १८.०२.२०२६ पासून करणे आवश्यक आहे व त्यानुसार प्रत्यक्ष वेतन अदा करणे देखील आवश्यक आहे. या दिनांकानंतर जे उमेदवार शिक्षण सेवक पदावर नव्याने नियुक्त होतील, त्यांना नियुक्तीच्या दिनांकापासूनच वेतनिश्चितीचा लाभ अनुज्ञेय असेल. परिविक्षाधीन कालावधी लागू राहील याचा अर्थ या कालावधीतील कामगिरीचे मुल्यमापन होऊन त्यानंतर शिक्षक पदावर नियुक्ती दिली जाईल. शिक्षण सेवक/परिविक्षाधीन कालावधीतच वेतन संरक्षण व वेतननिश्चितीचे लाभ देणे आवश्यक आहे.</td></tr>
<tr><td>५.</td><td>शिक्षणसेवकांच्या परिविक्षाधीन कालावधीमध्ये वेतननिश्चिती करून नियमित वेतनश्रेणीचे प्रत्यक्ष लाभ द्यायचे आहेत का?</td></tr>
<tr><td>६.</td><td>संदर्भाधीन शासन निर्णयानुसार वेतननिश्चिती करण्यास मान्यता देण्यात आली असली तरी तीन वर्षांचा परिविक्षाधीन कालावधी लागू राहील, अशी तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे परिविक्षाधीन कालावधी संपल्यानंतर वेतननिश्चिती करण्यात येईल असे काही प्रशासनिक अधिकारी यांचे म्हणने आहे.</td></tr>
<tr><td>७.</td><td>सेवाजोड व वेतन निश्चिती करत असतांना अनुसरावयाची कार्यपद्धती स्पष्ट करावी. म्हणजे सेवाजोड हे सामान्य प्रशासन विभाग व वेतन निश्चिती ही वित्त विभाग किंवा वेतन पडताळणी पथक किंवा कॅफो हे करतील की फक्त शिक्षण विभागाने स्वतंत्रपणे करायची आहे?</td><td>त्या त्या नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे या संदर्भात जी प्रचलित कार्यपध्दती आहे त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.</td></tr>
<tr><td>८.</td><td>बहुतांश प्रशासन अधिकारी असे म्हणत आहेत कि, "नोकरी स्वीकारत असतांना तुम्ही मानधन तत्वावर स्वीकारली आहे त्यामुळे तुम्हाला नियमित वेतनश्रेणी</td><td>असा दावा केला असल्यास तो वस्तुस्थितीवर आधारीत नाही. संदर्भाधीन शासन निर्णय हा शासनाने मा. उच्च न्यायालयाचे काही प्रकरणातील</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | कशी काय देता येईल?" यावर देखील प्रकाश टाकावा. | न्यायनिर्णय विचारात घेऊन व वित्त विभागाच्या अभिप्रायानुसार जाणिवपूर्वक घेतला आहे. त्याची तंतोतंत अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. |

३. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. रानिप्र-२०२४/प्र.क्र. ३५/सेवा-४, दि. ३०.०५.२०२४ अन्वये नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना /राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली अंतर्गत दि. ०१.११.२०२५ रोजी व त्यानंतर सेवेत प्रथम नियुक्ती झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची त्याच किंवा अन्य विभागात /कार्यालयात नवीन नियुक्ती करण्यात आल्यास पूर्वीची सेवा सेवानिवृत्ती उपदानाच्या प्रयोजनार्थ अर्हताकारी सेवेची परिगणना करण्याकरीता जोडून देण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. या विभागाच्या अधिनस्थ असलेल्या १०० टक्के अनुदानित खाजगी शाळा, ज्यामध्ये प्राथमिक/उच्च प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळा तसेच अध्यापक विद्यालये/शासकीय विद्यानिकेतने व सैनिकी शाळा यांचा समावेश आहे, त्यातील विहित पध्दतीने नियुक्त झालेले व या परिपत्रकातील अटींची पूर्तता करणाऱ्या शिक्षण सेवक, नियमित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना सदर परिपत्रकातील तरतूदी लागू करण्यास याद्वारे शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्यानुसार संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांनी आवश्यक ती कार्यवाही त्यांच्या स्तरावर करावी.

४. संदर्भाधीन शासन निर्णय स्वयंस्पष्ट असताना पात्र उमेदवारांना वेतन संरक्षणाच्या लाभापासून वंचित ठेवण्याबाबत क्षेत्रिय कार्यालयांनी दाखविलेली अनास्था अयोग्य आहे. याबाबत शासनाकडे यापुढे तक्रार प्राप्त झाल्यास संबंधित अधिकाऱ्यास व्यक्तिश: जबाबदार धरण्यात येईल. आयुक्त (शिक्षण) यांना सूचित करण्यात येते की, संदर्भाधीन शासन निर्णयाच्या काटेकोट अंमलबजावणीबाबत आपण आपल्या स्तरावर आढावा घेऊन सर्व संबंधितांना आवश्यक त्या सूचना तात्काळ द्याव्यात.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०६१५१४०३०४०७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by ABASAHEB ATMARAM KAWALE
Date: 2026.06.15 14:04:09 +05'30'

(आबासाहेब कवळे)

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.

२) शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
३) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
४) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
५) सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक/योजना)
६) सर्व गट शिक्षणाधिकारी
७) निवड नस्ती- टीएनटी-१